जा.क्र.पोसआ/४५६३ /२०१९
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर
यांचे कार्यालय, दिनांक १६/ ०५ /२०१९

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.

आदेश,

ज्याअर्थी, लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०१९ साठी दिनांक २३/०४/२०१९ रोजी पुणे, बारामती या लोकसभा मतदार संघात मतदान झालेले आहे व या दोन्ही मतदार संघांची मतमोजणी दिनांक २३/०५/२०१९ रोजी पुणे शहर आयुक्तालय हद्दीत " धान्य गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे " येथे होणार आहे. सदर मतमोजणी प्रक्रिया सुरळीतपणे व शांततेत पार पडण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था राखणेकामी, सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सार्वजनिक उपद्रव टाळण्यासाठी " धान्य गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे" येथील २०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी शिवाजी बोडखे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, धान्य गोडाऊन, कोरेगाव पार्क, पुणे, येथील २०० मीटर परिसरात दिनांक २३/०५/२०१९ चे ००.०१ वा. पासून ते मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालील प्रमाणे निर्बंध घालण्यात येत आहेत.

१) मतमोजणीच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे अधिकृत-अनधिकृत हत्यारे तसेच परवान्यावरील कोणत्याही प्रकारची हत्यारे घेवून फिरणेस या आदेशान्वये मनाई करीत आहे.
   सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकिय कर्मचाऱ्यांना (पोलीस दल, सरंक्षण दल, तुरूंग विभाग, बँक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांना ) लागु राहणार नाही. तसेच ज्या परवाना धारकास रूढीप्रमाणे बंदूक प्रदर्शित करण्याचा अधिकार आहे त्यांना हा आदेश लागू राहणार नाही.
२) मतमोजणीच्या परिसरात मोबाईल, कॉर्डलेस फोन, पेजर, वापरण्यास अगर घेवून येण्यास मनाई करण्यात येत आहे. (कर्तव्यावर असणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना हा आदेश लागू राहणार नाही.)
३) मतमोजणीच्या परिसरात खाजगी इसमांना ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.
४) मतमोजणीच्या परिसरात कोणताही मजकूर लिहण्यास अगर छापील मजकूर प्रदर्शित करण्यास मनाई करण्यात येत आहे.
५) मतमोजणीच्या परिसरात शासकीय वाहने सोडून कोणत्याही प्रकारचे वाहन आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे.
६) मतमोजणीच्या परिसरात पास शिवाय प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.
७) मतमोजणीचा निकाल जाहिर झाल्यानंतर दि. २३ मे २०१९ रोजी विजयी मिरवणूका काढण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.
सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि. १६/०५/२०१९ रोजी दिला आहे.

(शिवाजी बोडखे)
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर.

ठिकाण :- पुणे शहर.
दिनांक :- १६/०५/२०१९